नि.फौ.ख.क्र. ३८७/ २०२३

निशाणी क्र. २६

<u>साक्षीदार क्र. १ चा शपथेवर जबाब.</u>

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – केशरबाई केशव बिडगर

वय सुमारे – ५० वर्षे, व्यवसाय – शेती

राहणार – वांगी, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.आर. धुमाळ यांचे मार्फत.</u>

१ माझ्या घरी मी, माझे पती, माझी सुन व तीन मुले रहातो. दिनांक ९.१०.२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता माझ्या रहात्या घरी गट क्र. ३५ मध्ये घडली होती. माझी २१ एकर शेती आहे. त्यापैकी १३ एकर शेतीचा वाद होता. मी प्रांत कार्यालय श्रीरामपूर येथे विलास होन याच्या विरुध्द अर्ज केला होता त्यानंतर अहमदनगर येथे व त्यानंतर नाशिक येथे आयुक्तांकडे अर्ज केला होता. सर्व ठिकाणी निर्णय माझ्या बाजुने झाला. तेव्हा पासुन सदर शेती माझ्या ताब्यात होती. आरोपी क्र. ४ व ५ यांनी मला आम्ही विलास होन यांच्याकडून जमिन घेतली आहे असे म्हटले व १३ एकर शेती मधील ६ एकर आम्हाला दे, नाहीतर जिवे मारण्याची धमकी देत होते. घटनेच्या दिवशी आम्ही रहात्या घरी मक्याचे खळे काढत होतो. तेव्हा आरोपी तेथे आले व आम्हाला लाथाबुक्यांनी व दांडयाने मारायला सुरुवात केली. त्यामुळे आम्ही खाली पडलो. आरोपी क्र. १ च्या हातात लोखंडी पहार होती. आरोपी क्र.२ च्या हातात कु–हाड होती. आरोपी क्र. २ ने कु–हाड माझा मुलगा अमोलच्या पायावर मारली त्यामुळे त्याचा पाय मोडला. माझा मुलगा पांडुरंग याला आरोपी क्र.१ ने डोक्यावर पहार मारायला घेतली असता मी माझा हात मध्ये आणल्याने माझ्या उजव्या हाताच्या बोटांना पहार लागली. त्यामुळे माझी उजव्या हाताची दोन बोट मोडले. आरोपी क्र. १ ने त्याला पहारने त्याच्या अंगावर खूप मारहाण केली. त्यानंतर आम्ही बेशुध्द झालो. माझ्या पतीने ११२ क्रमांकावर फोन केला त्यानंतर पोलिस तेथे आले. पोलिसांनी रुग्णवाहीका बोलाविली व आम्हाला ग्रामीण रुग्णालय श्रीरामपूर येथे आणले. तेथे पांडुरंगला रक्ताच्या उलटया झाल्याने

आम्हाला नगर येथे सिव्हील हॉस्पीटलला नेले. मी दवाखान्यात असताना आरोपी क्र. ४ व ५ यांनी माझी साडेसहा एकर जमिन नांगरली. त्यांनी माझ्या घरातील भांडे फोडले, ट्रॅक्टर व गाडी फोडली. माझे गळयातील मंगळसुत्र व माझ्या सुनेचे छोटे मंगळसुत्र (गंठण) गहाळ झाले. आरोपी क्र. १ व २ यांनी माझा मुलगा पांडुरंग याचे केस कापले. आरोपी मला वारंवार धमकी देतात. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता. आता मला सदर जबाब दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. जबाबवर फिर्यादीची सही असल्याने त्यास फिर्याद गृहित धरण्यात येते. त्यास **निशाणी क्र.२७** देण्यात येते. मला व माझ्या मुलांना ज्या पहार, कु–हाड व काठीने मारहाण केली ती दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला मुद्देमाल क्र. ५२/२०२४ वरील कु–हाड दाखविली ती तीच आहे. त्यास **वस्तु अ** देण्यात येते. आता मला मुद्देमाल क्र. ५२/२०२४ वरील पहार दाखविली ती तीच आहे. त्यास **वस्तु ब** देण्यात येते. आता मला मुद्देमाल क्र. ५२/२०२४ वरील लाकडी दांडा दाखविला तो तोच आहे. त्यास **वस्तु क** देण्यात येते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आरोपींपैकी नवनाथ बिडगर, विशाल दांडगे व आदेश बारसे हे न्यायालयात हजर आहेत.

**(आरोपी तर्फे विधीज्ञांनी दिलेल्या अर्ज निशाणी क्र. २८ वरील आदेशानुसार उर्वरित सरतपास पुढील तारखेपर्यंन्त तहकुब )**

श्रवणोत्तर स्वीकृती....

(प्रियंका अं.पटेल)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.

दिनांक–२४.०१.२०२५